Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019 Special Issue- 102

# महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास : जात, वर्ग आणि लिंगभाव परिप्रेक्ष्य



अतिथी संपादक :

**डॉ. एम.आर. देशमुख**

प्राचार्य,

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित,

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

हरसूल, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक

विशेषांक संपादक :

**प्रा. अजय अहिर**

**प्रा. देवानंद मंडवधरे**

मुख्य संपादक :

**डॉ. धनराज धनगर**

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 102 : महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास : जात, वर्ग आणि लिंगभाव परिप्रेक्ष्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# कामगार चळवळीतील जात-वर्गीय जाणीवा

**अजय एकनाथ अहिर**
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हरसुल
ता. त्र्यंबकेश्वर ,जिल्हा नाशिक

भारतात भांडवलशाहीचा उदय सर्वसाधारणपणे ब्रिटीश सत्तेचा काळ सुरु झाल्यानंतर झाला.भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या उद्भवाला काही आर्थिक सामाजिक पार्श्वभूमी असते. भारतातील आर्थिक आणि सामाजिक जीवन जातीबद्ध असल्यामुळे भारतातील भांडवलशाहीची रचना ही जातवर्गीय जाणीवेने कायमच प्रभावित राहिली.सरंजामदारी मालकी हक्काचे संवर्धन ,वस्तूंच्या विनिमयात चलन माध्यमांचा वाढता वापर,अन्नधान्य व इतर शेतीमालाचे वाढते व्यापारी उत्पादन,चलनरुपात वाढती करवसुली, पतपुरवठा करणाऱ्या व्यापारी पेढ्या,बाष्प शक्तीवर चालणाऱ्या यंत्राचा उपयोग इत्यादी अनेक प्रक्रिया भांडवलशाहीपूर्व समाजात घडतात. ह्या प्रक्रियेतून जो धनसंचय होतो त्यातून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा गर्भ जुन्या सरंजामदारी व्यवस्थेत निर्माण होतो.[1]

**भांडवलदारी व्यवस्थेवर जातींचा प्रभाव**

भारतात कालबाह्य झालेल्या जातिसंस्थेच्या चौकटीत भांडवलदारीचा उदय होत होता. येथील प्रत्येक प्रदेशात फक्त काही जातींनाच व्यापाराची परंपरा होती. ईस्ट इंडिया कंपनीला मोगल साम्राज्याशी व्यापारी संबंध ठेवण्याच्या दृष्टीने सूरत व भडोच ही बंदरे सोयीची होती. कंपनीचे व्यापारातील मध्यस्थ म्हणून काम करून गुजरातेतील जैन, बनिया, पारशी, बोहरा अशा तीन-चार जातीच्या लोकांनी प्रथम भांडवल गोळा केले. चीनबरोबर चाललेल्या अफूच्या व्यापारातही मुंबईतील या जातींचे लोक होते. [2]

भांडवलशाही व्यवस्थेत भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग आपल्याला निर्माण झालेले दिसून येतात हे दोन्ही वर्ग येथील जातीबद्ध असल्यामुळे जातीच्या उतरंडीच्या रचनेतच कार्यरत असलेले दिसून येतात. यावरून वर्ग हे जात जाणीवेने कसे प्रभावित होते हे लक्ष्यात येते. पैसा जमा झाल्यावर आधुनिक तंत्राचा वापर करून उत्पादन करणारे पहिले कारखाने उच्च जातीतील जैन, पारशी, बनिया, बोहरा यांनी उभे केले. पुढे मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचा वापर करून टाटा, बिर्ला, दालमिया, थापर अशा काही कुटुंबांनी अनेक कंपन्यांवर प्रभुत्व मिळविले. मोठ्या उद्योगपतींच्या मदतीने जे अनेक उद्योग उभे राहिले त्यांच्यामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी नातीगोती व जात उपयुक्त ठरली. सुरतच्या जरी धंद्यात राणा जातीचे लोक पुढे आले आहेत आणि कापड उद्योगावर घांची जातीच्या लोकांचे प्रभुत्व आहे. ऐकेका उद्योगात एका जातीचे लोक मोठ्या संख्येने आढळतात तसेच एका प्रांताचे, भाषा बोलणारे व एका धर्माच्या लोकांचे गटही आढळतात.[3] १९व्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबई शहराचा जो जलद गतीने विस्तार झाला त्यामुळे शहरात बांधकाम उद्योगाच्या व्यवसायाचा उदय होऊन भरभराट झाली. पुरवठ्यातीलअडचणी, कच्च्या मालाच्या वाढत्या किमती आणि पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान वाढलेले मजुरीचे दर या सर्व अडचणींना न जुमानता घरबांधणीची मागणी

[1] गडकरी जयंत,भारतीय भांडवलशाहीचा विकास : एक रूपरेखा,श्रमिक प्रबोधिनी प्रकाशन, मुंबई , पृ १

[2] पंडित नलिनी ,'विसाव्या शतकातील जातीव्यवस्था ,विचारवेध संमेलन अध्यक्षीय भाषणे पृ १७९

[3] तत्रैव

वाढतच होती [1] इ स १९००पासून सुरू असलेल्या बांधकामाच्या योजना, निरनिराळे भरीव उपक्रम उपक्रम आणि प्रांतिक सरकारच्या महत्त्वाच्या विकासाच्या योजना यामुळे बांधकाम व्यवसायात वाढ झाली. मुंबईच्या बांधकाम व्यवसायाने अपवादात्मक भरभराटीच्या काळाचा अनुभव घेतला. याचा परिणाम म्हणजे नेहमी पेक्षा वेगळी कामगारांची मागणी निर्माण झाली[2]

**कामगारांचे स्थलांतर**

इ.स 1911 मध्ये मुंबई प्रांतातील 6 प्रमुख जिल्ह्यांमधून 72.83% एवढे कामगार आले. मुंबईतील सर्व कामगारांपैकी 72.83% कामगार सहा जिल्ह्यांमधून आले होते. 1921 मध्ये मात्र या सहा जिल्ह्यांमधून 57.65% पर्यंत येण्याचे प्रमाण कमी झाले आणि 1931 पर्यंत 41.80% पर्यंत कमी झाले. उत्तर भारतातून 1911 मध्ये 3.05% कामगार आले. 1921 मध्ये याचे प्रमाण वाढून ते 9.42% झाले. 1931 मध्ये 11.82% पर्यंत प्रमाण वाढले. 1911 ते 1931 पर्यंत 50 मैल किंवा त्याच्या पेक्षाही जास्त अंतरावरुन येणारे लोक 3.33% पासून 15.61% पर्यंत वाढले. उत्तर भारतातून येणाऱ्यांचे प्रमाण वाढले ते 1940 मध्ये 19.29% पर्यंत वाढले आणि 1954 मध्ये 22.4% झाले.[3]

सुती कापड उद्योग मुंबईमध्ये १९व्या शतकाच्या मध्याला सुरू झाला आणि २०व्या शतकाच्या सुरुवातीला भरभराटीला आला. इ.स. १८८६ते१९०५ या वर्षाच्या काळात ९५ कापडगिरण्या मध्ये ७४,००० कामगार होते ते वाढून १९७ कापडगिरण्या आणि १,९५,००० कामगार झाले. यावरून कापड उद्योगाच्या भरभराटीची आणि विकासाची कल्पना येते.[4] कापूस आणि कापडाची बाजारपेठ ही मुंबईतील महत्त्वाची बाजारपेठ होती. ही बाजारपेठ उद्योगांशी जोडली गेली होती. अनेक अभियांत्रिकीचे वर्कशॉप आणि कारखाने हे कापडउद्योगाची रचना आणि त्यातील यंत्राची दुरुस्ती व देखभाल यासाठी सुरू झाले होते. चामड्याचा उद्योग हा गिरण्यामध्ये पुल्लीस आणि यंत्रासाठी बँडस् आणि बेल्ट पुरवण्याचे काम करीत होता. गिरण्यांमध्ये स्पिनिंग, व्हीव्हींग, डाईंग आणि कापडाचे प्रिंटींग इ. कामांची विविधता होती. सिझिंग पावडर आणि रसायनांच्या गिरण्यातील वाढत्या मागणी मुळे त्यांचा पुरवठा करणारे रासायनिक छोटे उद्योग शहरात सुरू झाले.[5]

**कामगार वर्गाची संस्कृतीलक्षी जाणीव:**

भांडवलशाहीच्या आगमनानंतर उदयाला आलेले वर्ग जातीला मोडून नव्हे तर जातीच्या चतु:सिमेत कार्यरत राहिले. भारतातल्या वर्ग चळवळींना जातिव्यवस्थेने कायम ग्रासले आहे. दिपेश चक्रवर्ती यांचा बंगालमधील जुट उद्योगातील कामगारांचा अभ्यास त्याची ग्वाही देतो. चक्रवर्तींनी संस्कृतीलक्ष्मी परिघातच

---

[1] Chandavarkar Rajnarayan , The Origins of Industrial capitalism in India Business strategies and the working classes in Bombay 1900-1940,Cambridge University Press,1994, pp117

[2] तत्रैव

[3] तत्रैव

[4] Sen sukomal,working class of India History of emergence and Movement 1830-1990,K.P.Bagchi & company Calcutta ,1977 ,पृ ३३

[5] उपरोक्त 1994, पृ ७६

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 102 : महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास : जात, वर्ग आणि लिंगभाव परिप्रेक्ष्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

कामगार वर्गाच्या जाणिवेचा शोध घेतला. ही मर्यादा लक्षात घेऊनही त्यांनी नोंदवलेली निरीक्षणे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ते सांगतात, संपासारख्या विद्रोही/ क्रांतिकारक स्थितीमध्येही कामगार वर्गाचे भान वर्गीय असत नाही. धर्म, प्रादेशिक अस्मिता, जातीय रिवाज अशा आद्यनिष्ठांच्या आधीन कामगार वर्गाची जाणीव असते.[1] या उदयोगामध्ये भारतातल्या निरनिराळ्या प्रांतामधून अनेक कारागीर कामगार म्हणून भरती झाले. कारागीर आपली भाषा, संस्कृती, जात,धर्म या पारंपारिक ओळखी घेवून शहरात दाखल झाले. तत्कालीन मुंबई प्रांतातील रत्नागिरी, सोलापूर, गुजरात, सातारा,पुणे इ. भागांमधून अनेक शेतकरी, कारागीर, दलित, हे मुंबई मध्ये आले. त्यामुळे ग्रामीण भागात असलेल्या जातनिहाय वस्त्या या मुंबई सारख्या भांडवली शहरात निर्माण झालेल्या दिसतात. नव्या भांडवली व्यवस्थेतही जात जाणीवा कशा कार्यरत होत्या हे दिसून येते. या पारंपारिक जाणिवांचा प्रभाव कामगारांच्या भरती पासून ते त्यांच्या संघटना मध्येही दिसून येतो.

इ स १८९० मध्ये एन.एम. लोखंडे यांनी जरी 'बॉम्बे मिल हेडस् असोसिएशन'ची स्थापना केलेली असली तरी प्रत्यक्षात मात्र तिला खरीखुरी संघटना म्हणता येत नव्हते. कारण तिच्याकडे सभासद नोंदणी नव्हती, घटना किंवा नियमावली नव्हती, निधी नव्हता. त्यामुळे खऱ्या अर्थाने कामगारांच्या अन्यायास वाचा फोडणाऱ्या संघटनेचा जन्म होण्यास बराच कालावधी जावा लागला [2]इ स १९०५ ते इ. स १९०९ या काळात मुंबईत कापड गिरण्यात अनेक संप झाले. याच काळात काही महत्त्वाच्या कामगार संघटनाही निर्माण झाल्या. इ.स १९०५ मध्ये कलकत्याला प्रिंटर्स युनियन, इ.स १९०७ ला बॉम्बे पोस्टल युनियन, इ.स १९१० मुंबई गिरणी कामगारांची 'कामगार हितवर्धक सभा' खऱ्या अर्थाने आधुनिक कामगार संघटनेची स्थापना इ.स १९१८ मध्ये मद्रासमध्ये चूलाई येथे श्री.बी.पी. वाडीया यांनी 'मद्रास लेबर युनियन'ची स्थापना करून केली. याच काळात अहमदाबादला 'स्पिनर्स युनियन' व 'वीव्हर्स युनियन' असे दोन संघ निर्माण झाले. यांच्या एकत्रीकरणातून 'अहमदाबाद टेनसटाईल लेबर असोसिएशन' निर्माण झाली.

**कामगार चळवळीतील ब्राह्मण-ब्राह्मणेतर संघर्ष:**

कामगार चळवळी मध्ये जात जाणीवेमुळे अंतर्गत संघर्ष दिसून येतो. यामध्ये ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद हा केंद्रस्थानी राहिला आहे.इ.स १९१८ सालच्या अखेरपासून शाहू महाराज कामगार संघटना स्थापन करा असे मजूर वर्गास सांगत होते.भांडवलवाल्यांमध्ये ब्राह्मण व वैश्य वृत्तीच्या लोकांचा विशेष भरणा असल्याने त्यांना दाबात ठेवल्या शिवाय मजुरांची उन्नती होणे कठीण आहे असे छत्रपतींना वाटत होते त्यामुळे ते कामगार संघटना स्थापन करण्याचा तोडगा सुचवीत होते.जातीसंस्था नष्ट करावी असा शाहू आग्रह धरीत असले तरी वर्ग नष्ट असे त्यांना वाटत नव्हते.२७ जुलै १९२० रोजी कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेत केलेल्या अध्यक्षीय भाषणात "मी जात नको असे प्रतिपादन करतो परंतु वर्ग पाहिजेत असे माझे ठाम मत आहे." असे त्यांनी स्पष्ट पाने म्हंटले आहे.[3] मुंबईच्या कामगारात तेव्हा क्षत्रिय,शुद्र व अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीतील माणसे होती गिरणीमालक वैश्य वर्णाचे होते तर व्यवस्थापनात ब्राह्मणांची संख्या नजरेत भरण्याजोगी होती. यावरून कामगार चळवळीतील जातवर्गीय जाणीवा कशा होत्या हे लक्ष्यात येते. तत्कालीन वर्तमान पत्रात याचे संदर्भ आहेत. कामगार कामगार चळवळीच्या संदर्भात रावसाहेब कासले यांचा 'कैवारी'मध्ये फोटो प्रसिद्ध झाला. त्यावर 'केसरी'ने गिरणी कामगारांच्या चळवळीत जातिविशिष्ट चळवळी घुसडू नयेत या सबबीखाली पुढील मजकूर प्रसिद्ध केला, "एका ब्राह्मणेतर वर्तमानपत्राने नुकत्याच झालेल्या मारहाणीत जखमी झालेले कासले

---

[1] बगाडे २००८ पृ १२०

[2] चव्हाण चंद्रकांत,सोलापूरची गिरणी कामगार चळवळ १९००-१९६५ ,आचार्य जम्बुसागर ग्रंथमाला ,सोलापूर,२०१३,पृ २४

[3] फडके य.दि.,विसाव्या शतकातील महाराष्ट्र ,राजकीय इतिहास १९१४ ते १९२० ,खंड २ रा ,श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८९,पृ २८१-२८२

ISSN : 2348-7143
January-2019

यांचा फोटो दिला आहे! ब्राह्मणेतर कामगार पुढाऱ्यांना डांगे प्रभृती मंडळीपासून, ब्राह्मणेतर चळवळीचे विष त्यांच्या अंगी भिनवून फोडण्याचा प्रयत्न सुरु आहे."[1] डेलीमेल वृत्तपत्रात मजकूर आला, 'युनियनचे साठ हजार सभासद ब्राह्मणांनी केले', या मजकूराला कैवारीने उत्तर दिले खाई त्याला खवखवे? कैवारीने डेलीमेलमधल्या पत्राविरुद्ध टिका केली म्हणून ब्राह्मणांना मोठा संताप चढला. कारण डेलीमेल पत्र गिरणीवाल्या पेटीटचे, गिरणीवाल्या पेटीटच्या पत्राविरुद्ध कैवारीने लिहिले म्हणून कैवारीचा अंक जाळून टाका असा एका भटाने ठराव आणला. त्यावरुनच ब्राह्मणांचा काय डाव आहे तो कामगारांनी ओळखावा.[2]असे कैवारी या वृत्तपत्रा मध्ये लिहिले आहे. दिनकरराव जवळकरांनी 5 जानेवारी 1929 च्या 'कैवारी'मध्ये केसरीवर टिका करताना जवळकर म्हणतात, "हा केसरीचा बातमीदार कोण आहे व त्याच्या बुडाशी कोण आहेत हे आम्हाला माहीत आहे. या सगळया ब्राह्मणी कारवाईच्या मागे भांडवलशाही आणि सरकार आहे या सगळया ब्राह्मणी गारुड्यांच्या पाठी गिरण्यांचे मालक आहेत. केसरी पत्राचा आणि भांडवलवाल्यांचा फारच घरोब्याचा संबंध आहे."[3] ज्या डेलीमेल पत्रात ब्राह्मणांनीच साठ हजार सभासद केले, असे डांबिसपणाचे विधान केले ते पत्र युनियनमधील भटे उराशी धरून बसलीत यावरून युनियन मधली भटे कामगारांचे वैरी आहेत, कामगारांना फसवित आहेत, ब्राह्मणी गुलामगिरी लादू पाहत आहेत हे सिद्ध होते आणि या भटांच्या पाठीमागे गिरणीवाले आहेत हे सिद्ध होते. ब्राह्मणेतरांचा कैवारी यांना नको, गिरणीवाल्या पेटिटचा डेलीमेल पाहिजे. कारण कैवारीमुळे मागासलेला वर्ग जागा होईल, कैवारीमुळे कामगार खरे कामगारांचे राज्य करतील, कैवारीमुळे श्री. आळवे, कासले, ताम्हणेकर वगैरे ब्राह्मणेतरच पुढारी होतील[4]. लोकमान्य टिळकांनाही ब्राह्मणेतरांनि विरोध केला होता. सन १९११ च्या ऑगस्टमध्ये बी.पी. वाडिया व लो. टिळक यांना वॉशिंग्टन येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे प्रतिनिधी म्हणून नेमण्यात यावे, अशी काही मंडळींनी सूचना केली, या सूचनेचा निषेध करण्यासाठी लोअर परळ येथे गिरण्यातील मास्तर, मुकादम व कामगार यांची ३१ ऑगस्ट १९१९ रोजी देवजी गुणाजी मास्तर यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली. त्यावेळी नारायण महादेव कदम यंनी सांगितले काही ब्राह्मण वकील, डॉ[नटर वगैरे मंडळींनी टिळक व वाडिया यांना वॉशिंग्टन येथे परिषदेत जाण्यासाठी कामगार वर्गाचे प्रतिनिधी म्हणून निवडले आहे. परंतु कामगार वर्गास रोज चौदा तास काम करावे लागत असे ते बारा तास करण्याची चळवळ सुरू झाली. त्यावेळी टिळक यांनी भांडवलवाल्यांचा पक्ष उचलून धरून 'कामगाराच्या कामाचे बारा तास करावे' या मागणीविरुद्ध केसरीमध्ये लेख लिहिले. एकाही पत्राने कामगारांना चौदा तास राबावे लागते या कलमी पद्धतीविरुद्ध लिहिले नाही. सन १९१७ मध्ये भारतमंत्री आले त्यावेळी टिळकांनी किंवा त्यांच्या पक्षाच्या लोकांनी कामगारांची गाऱ्हाणी त्यांच्या कानावर घातली नाही. हल्ली जो तो कामगारांचा पुढारी व प्रतिनिधी होऊ पाहतो.[5] मुंबईचे माजी राज्यपाल लॉर्ड सिडन्हॅम यांनी २३ सप्टें. १९१९ रोजी बोले यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले, "हिंदुस्थानात खरे काम करणाऱ्या कामगारांच्या मताधिकाराची न्याय्य बाजू विचारात घेतली गेलेली नाही. म्हणून याला उपाय जातीय प्रतिनिधत्व किंवा या कामगारवर्गाला आपले प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार हाच होय. कोणत्याही वर्गाचे स्वतःचे हितचिंतक

---

[1] फडके य दि,'दिनकरराव जवळकर समग्र वाङ:मय, महात्मा फुले प्रतिष्टानचे प्रकाशन , श्रीविद्या प्रकाशन ,पुणे,१९८४ पृ २३२

[2] तत्रैव १९८४ पृ २४०

[3] तत्रैव १९८४ पृ २३४

[4] तत्रैव १९८४ पृ २४२

[5] कीर धनंजय ,लोकहितकर्ते बाबासाहेब बोले,पोपुलर प्रकाशन , मुंबई १९७८ पृ १००

प्रतिनिधी असल्याशिवाय त्यांना त्यांची गाऱ्हाणी मांडता येणे अशक्य आहे. ज्या वर्गाच्या हिताची व हक्कांची काळजी 'कामगार हितवर्धक सभा' घेते त्या हक्काची काळजी ब्राह्मण व भांडवलदार घेणे अशक्य आहे."[1]
कामगार हितवर्धक सभेची

कामगारांची पहिली परिषद रविवार १४ डिसें. १९१९ रोजी भरली होती. परिषदेच्या शेवटी आभार मानताना कामगार हितवर्धक सभेचे कार्यवाह बाबासाहेब बोले म्हणाले, "ज्या वर्गातून कामगार येतो त्या शेतकऱ्यांना कशा हाल-अपेष्टा भोगाव्या लागतात हे सांगून त्यांनी जमलेल्या प्रतिनिधींना विनंती केली की, कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या दयनीय परिस्थितीस जे कारणीभूत आहेत त्या भांडवलदार व पुरोहितवर्गाशी झगडण्याचे शिक्षण कामगारांना द्यावे."[2]असे मत मांडले.

**दलित कामगारांची भूमिका:**

भांडवली व्यवस्थेतही अस्पृश्य जातीतून आलेल्या कामगारांना हीन वागणूक मिळत होती. अस्पृश्यांना कामगार म्हणून सुरुवातीला घेतले जात नव्हते.इ.स १९३८ मधल्या संपामध्ये दलितांनी संपात सहभाग घेतला नाही. कामगार संपावर गेल्यावर त्यांची जागा आपल्याला मिळेल या संधीची त्यांनी वाट पाहिली. दलितांचा प्रश्न कामगारांच्या पगारवाढीचा नव्हता तर कामगार म्हणून कामगार क्षेत्रात प्रवेश मिळवायचा होता. दलितांना कामगार वर्गामध्ये सामील होण्यासाठी कामगार वर्गाच्या संपाविरोधात भूमिका घ्यावी लागते हे जातिव्यवस्थेने उभे केलेले संकट आहे.[3] डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी अस्पृश्य जातीतील कामगारांसाठी न्याय हक्कांची मागणी केली होती. त्यासाठी त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाचे सभासद होताना धर्माची,जातीची, वगैरे कृत्रिम भेदांची आडकाठी मुळीच नाही.मजूर म्हंटला की तो झाडून आपल्या पक्षाच्या झेंड्याखाली जमा झाला पाहिजे.सर्व श्रमजीवी वर्गाच्या हिता करिता झगडणे हाच पक्षाचा उद्देश आहे. कम्युनिस्टांची अस्पृश्य कामगाराबाबत भूमिका वेगडी होती.अस्पृश्य कामगारांना कपडे खात्यात काम्देत नव्हते,त्यांना जास्त पगाराचे काम मिळण्यात अडथळा येत होता याची जबाबदारी कम्युनिस्ट घेत नव्हते.[4] त्यामुळे वर्ग संघर्ष हा अस्पृश्य कामगारांचा प्रश्न नव्हता. कर्मठ मार्क्सवाद्यांची धारणा आहे कि,भारतीय कामगार वर्ग हा वर्ग आहे पण धार्मिक व जात-जमातीय संघर्षांना बळी पडतो कारण धर्मा प्रमाणे जातीजमाती या सामाजवस्तूच्या भौतिक पायाचा भाग नसून वैचारिक वरच्या इमल्याचा भाग आहेत असे मानतात [5]या विरोधात डॉ .बाबासाहेब असे म्हणतात की धर्म नाही तर जाती या वर्ग बनावटीत अडसर असतात.[6] भारतीय कामगार वर्ग हा खऱ्या वैज्ञानिक अर्थाने वर्ग बनल्या शिवाय क्रांती नेतृत्वाची जबाबदारी पार पाडू शकत नाही. म्हणून जाती व वर्गभेदाने पोखरलेला कामगारवर्ग मालकशाहीशी टक्कर देण्यास असमर्थ आहे[7] मुंबईतील आरमारी गोदी मध्ये अस्पृश्य कामगारांची स्वतंत्र संघटना निर्माण झाली. जातीव्यवस्थेमुळे वर्गमान निर्माण होत नाही

**जातिव्यवस्थेच्या रचनेमुळे विशेषतः**

उतरंडीच्या विषमतेमुळे व शोषणामुळे शोषित-अंकित जातींमध्ये समान हितसंबंधसाठी एकत्र येण्याची

---

[1] तत्रैव १९७८ पृ १०२

[2] तत्रैव १९७८ पृ १०७

[3] बगाडे उमेश, जात व वर्ग अंत की उन्नती ,जात वर्ग व परिवर्तनाचा लढा (संपा) विलास रणसुभे,लोकवाङ:मय गृह,मुंबई, २००८ १२०-१२१

[4] जनता २७ एप्रिल १९४०,वर्ष ९ वे अंक १२ वा पृ ४

[5] पाटील शरद,सत्यशोधक मार्क्सवादी, जुलै –ऑगस्ट १९८३,पृ २३

[6] तत्रैव, जुलै –ऑगस्ट १९८३,पृ २३-२४

[7] जनता ,शनिवार ५ ऑगस्ट १९४०,पृ ४ वर्ष ९ , अंक ३५

प्रवृत्ती निर्माण होत नाही. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून आजतागायत चाललेल्या वर्गलढ्यज्ञापासून एकवट वर्गभान असलेला कामगार वर्ग निर्माण झालेला नाही. जात, प्रदेश, धर्म, जमात यांची मात्तबरी आजही कामगारांमध्ये पाहायला मिळते. त्यामळे जात्यंताचा व वर्गांताचा ध्येयवाद बाळगणारे वर्गभान कसे घडवायचे असा जटील प्रश्न उभा राहतो. [1] कामगार वर्गाची संस्कृतीलक्षी जाणीव ही कामगार चळवळीमध्ये सतत कार्यरत असते.भांडवलशाहीच्या आगमनानंतर उदयाला आलेले वर्ग जातीला मोडून नव्हे तर जातीच्या चतुःसिमेत कार्यरत राहिले. भारतातल्या वर्ग चळवळींना जातिव्यवस्थेने कायम ग्रासले आहे. दिपेश चक्रवर्ती यांचा बंगालमधील जुट उद्योगातील कामगारांचा अभ्यास त्याची ग्वाही देतो. चक्रवर्तींनी संस्कृतीलक्ष्मी परिघातच कामगार वर्गाच्या जाणिवेचा शोध घेतला. ही मर्यादा लक्षात घेऊनही त्यांनी नोंदवलेली निरीक्षणे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ते सांगतात, संपासारख्या विद्रोही/ क्रांतिकारक स्थितीमध्येही कामगार वर्गाचे भान वर्गीय असत नाही. धर्म, प्रादेशिक अस्मिता, जातीय रिवाज अशा आद्यनिष्ठांच्या आधीन कामगार वर्गाची जाणीव असते.[2]

कामगारांच्या चळवळीतील जात जाणिवांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधाच्या माध्यमातून केला आहे.

---

[1] उपरोक्त

[2] तत्रैव, २००८ पृ १२०